# साने गुरुजी : एक महान व्यक्तिमत्त्व

– डॉ. सचिन काळेल

महान व्यक्तिमत्त्वांचे लेखन म्हणजे एक अफाट सागर असतो. सागरात एक अनोखी जीवसृष्टी नांदत असते. तिच्या दर्शनाने माणूस अचंबित होऊन जातो. त्याचप्रमाणे महान व्यक्तिमत्त्वांच्या लेखनात ज्ञान संस्कारांचे तेजस्वी मोती असतात. धर्म, संस्कृतिमूल्यांच्या जलधारा यातून वाहत असतात. त्यांनी मांडलेले क्रांतिकारक विचार पूर्ण समाजाला भरती-ओहोटी आणत राहतात. त्यांचे लेखन समाजाला आव्हान देत राहाते. प्रेम, त्याग, सौंदर्य, मांगल्य आणि माणूस नावाच्या धर्माची ते शिकवण देत राहाते. हे लिखाण केवळ एका कालखंडापुरते किंवा एखाद्या विशिष्ट मानवापुरते मर्यादित राहात नाही, तर देश, काल, परिस्थितीची सर्व क्षितिजे ओलांडून ते अखेर विश्वाशी सर्वकाळ नाते जोडते. ते अखंडितपणे मानवी जीवनाचे संवर्धन करते.

साने गुरुजी एक महान व्यक्तिमत्त्व. त्यांचे पूर्ण नाव पांडुरंग सदाशिव साने. यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील पालगड या गावी झाला. सन १८९९ ते १९५० असा त्यांचा कालखंड सांगता येतो. स्वातंत्र्याच्या आंदोलनात ते सहभागी झाले होते. स्वातंत्र्यानंतर आंतरभारती चळवळीच्या मार्गाने त्यांनी भारत जोडण्याचा प्रयत्न केला. एकमेकांच्या भाषा समजून घ्याव्यात आणि त्यातून देशभरात समता संस्कृती-मानवतेचा अखंड झरा वाहत राहावा असे त्यांना अभिप्रेत होते. ते स्वतः सेवादलात होते. सामाजिक कार्यपूर्तीसाठी त्यांनी १९४८ मध्ये 'साधना मासिक सुरू केले. स्वातंत्र्यलढ्यातील सहभागाबद्दल त्यांनी सुमारे१५ महिन्यांचा तुरुंगवास भोगला. समाजसुधारणेबरोबर साने गुरुजींनी लेखन केले. त्यांचे बहुतांश लेखन हे तुरुंगात असतानाच झाले. त्यांनी एकूण ७३ पुस्तके लिहिली. कथा, कविता लेखन, कादंबरी, चरित्र, निबंध असे त्यांचे विविध अंगी लेख दिसून येतात. इंग्रजी वाङ्मय याचा त्यांनी अभ्यास केला होता. त्यांनी इंग्रजी साहित्याचे भाषांतरही केलेले आहे. तीन मुले, श्यामची आई, सुंदर पत्रे, भारतीय संस्कृती, धडपडणारी मुले ही त्यांची पुस्तके आहेत. बलसागर भारत होवो, 'खरा तो एकचि धर्म', 'आता उठवू सारे रान' ही त्यांची गीते आजही लोकप्रिय आहेत.

साने गुरुजींचे साहित्य वाचताना लक्षात येते की, त्यांची दृष्टी विशाल होती.

त्यांनी मानवधर्म जाणला होता. तो त्यांना महत्त्वाचा वाटत होता. आपल्या गीतात ते लिहितात–

**खरा तो एकचि धर्म, जगाला प्रेम अर्पावे**
**जगी जे हीन अतिपतित, जगी जे दिन पददलित**
**तया जाऊन उठवावे, जगाला प्रेम अर्पावे**
**ज्यांना कोणी ना जगती सदा ते अंतरी रडती**
**तया जाऊन सुकवावे जगाला प्रेम अर्पावे,**

हे गीत म्हणजे साने गुरुजींचा स्थायिभाव म्हणता येईल. त्यांचा हाच काही भाव त्यांच्या साहित्यातून पाझरताना दिसतो. अशा विशाल हृदयाने ते लेखन करतात. त्यामुळे त्यांचे लेखन कालातीत झालेले आहे, केवळ साहित्य, कला या संकुचित भूमिकेतून ते लेखन करीत नव्हते. निळ्या निळ्या आकाशात हिंडणाऱ्या पक्षाची त्यांना उपमा देता येईल. आपले विचार जमेल तिथे पेरीत जावे. एका बीजामुळे शेकडो दाणे उगवतात. एका अंकुराचा महावृक्ष होतो. नवविचार नवभावनांची पौष्टिक भाकरी सर्वांना द्यावी. जीवनतत्त्वांचा विकास करावा. माणसांचे हृदय आणि बुद्धी जोपासावी, अशी त्यांची लेखनामागील भूमिका होती. एक संवेदनशील महान व्यक्तिमत्त्व म्हणून साने गुरुजींकडे पाहावे लागते.

साने गुरुजींना आपल्या देशाबद्दल, समाजाबद्दल चिंता आहे. येथे घडणाऱ्या अहितकारक गोष्टी त्यांना अस्वस्थ करतात. त्या तळमळीतून ते लेखनाला प्रवृत्त करतात. त्यांची गोष्ट म्हणजे केवळ एखादे कथानक घटनाप्रसंग नसतो, तर देश समाजातील महाभारत हे त्यातून स्पष्ट करत जातात. धडपडणारी मुले या कादंबरीच्या सुरुवातीला हिंदु–मुसलमानांच्या दंग्याची पार्श्वभूमी आहे. कथानकाची सुरुवात अमळनेर गावात नव्याने स्थापन झालेल्या विश्वधर्म मंडळाच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या थोर मोहम्मद पैगंबर पुण्यतिथी कार्यक्रमाने होते. या मंडळाविषयी गुरुजी लिहितात की, ईश्वरी सूत्रे हळूहळू हलवली जात असतात. या विश्वाचा विणकरी कसे, कोठून खोटे फेकील ते कोणाला कळणार? अमळनेरसारखे लहानसे शहर आणि तेथे हिंदू–मुसलमानांनी अन्य संस्कृती समजून घेण्यासाठी संस्था स्थापन करावी हे आश्चर्य नव्हे का? ती संस्था म्हणजे एक सूचिन्ह होते. तो लहान बिंदू जीवनदायी बिंदू होता. त्या बिंदूची अपेक्षा करू नका. त्या बिंदूचाच उद्या सिंधू होईल. मनन–चिंतन पद्धतीने गुरुजी लेखन करतात. आपल्या विविध जाणिवा ते व्यक्त करतात. चिंतनातून समाजातील विविध घटकांवर ते भाष्य करू लागतात. सर्व धर्मांचे व जातींचे लोक येथे आणून त्यांना गुण्यागोविंदाने नांदण्याचा एक महान प्रयोग भारत भाग्यविधाता करू पाहात आहे. भारतीय

इतिहासातले सोनेरी सूत्र विसरू नका. या शब्दात धडपडणारी मुले मधील स्वामी भारत देशाचे ध्येय निश्चित करतात.

स्वामी एका मुसलमानाला म्हणतात आपण सारेच मूर्तिपूजक आहोत. ज्यांच्यावर आपण प्रेम करतो तीच मूर्ती असते. महंमद म्हणतातच तुमच्या मनात काही भाव उत्पन्न होतात की नाही, तुम्ही मोहम्मद व कुराण यापलीकडे पाहाणार नाही. ख्रिस्ती मनुष्य बायबलाच्या पलीकडे जाणार नाही, म्हणजे तुम्ही आपल्या मूर्ती कायमच्या करून ठेवले आहेत. आपण मूर्तिपूजक व मूर्ती म्हणजे दोन्ही प्रकारचे. असो. तरच विकास होईल. साने गुरुजींच्या व्यक्तिमत्त्वातून त्यांचे एक वैशिष्ट्य लक्षात येते ते देश, समाज, परिस्थिती, धर्म, संस्कृती, प्रसारमाध्यमे यांची सर्वकाली परिस्थिती ठरवतात, पण त्याचबरोबर त्यात कोणते बदल होणे अपेक्षित आहे याविषयी ते भाष्य करतात. समस्येबरोबर त्या समस्येचे निराकरण ते करू पाहातात. त्यांच्या दृष्टीतील सकारात्मकता येथे जाणवते. त्यांच्या अंतरी असणारी तळमळ, आपुलकी, जिव्हाळा येथे जाणवते. मूर्तिपूजकाच्या लहान गोष्टीतून त्यांनी धर्मांधपणा नेमक्या रीतीने स्पष्ट केला आहे. मूर्तिपूजकाबरोबर मूर्तीभंजक ही भूमिका आपल्याला जमली पाहिजे असे ते सांगतात. साने गुरुजींची तत्त्वज्ञान आणि विचारांची बैठक त्यांच्या साहित्यातून व्यक्त होते. साने गुरुजी मानसशास्त्र उत्तम जाणतात. मुलाला दगड म्हटलं तर तो खरोखरच दगड होईल, जो वाईट असेल त्याचेही लक्ष त्याच्यामधल्या दिव्यतेवर, त्याच्यामधल्या संदेशावर आपण खेळवलं पाहिजे. उपनिषदातल्या या शास्त्रशुद्ध सनातन मार्गानेच एकमेकांना श्रद्धेने सुंदर करीत आपण पुढे गेले पाहिजे असे ते सांगतात. त्यांचे 'श्यामची आई' हे पुस्तक म्हणजे आईने आपल्या मुलाला प्रत्येक प्रसंगातून केलेल्या मूल्यशिक्षणाचे सार आहे. या पुस्तकातून साने गुरुजींनी आपल्या आईच्या आठवणी सांगितल्या आहेत. गुरुजींना त्यांच्या आईने आपल्या कृतीतून घडविले, प्रेम, त्यागाचे संस्कार दिले. अशी मांगल्याने पावित्र्याचा कलश असणारी आई साने गुरुजींनी आपल्या पुस्तकातून वर्णन केली आहे. त्यांचे या पुस्तकाने इतिहास घडवला आहे. गुरुजींनी लहान व कुमारवयीन मुलांसाठी अनेक पुस्तके लिहिली. त्यातून या मुलांना त्यांनी आपल्या देशाच्या संस्कृतीची ओळख करून दिली.

मुलांचे उद्‌बोधन बरोबर कल्पनेच्या भराऱ्या आणि मनोरंजनही या साहित्यातून घडते. साने गुरुजींचा बहुविद्या संघ त्यांच्या साहित्यातून जाणवतो. त्यातून ते आपले म्हणणे सांगतात. ते सहजपणे उपनिषदे, कुराण, सुफी, कवी संतजनांचे दाखले देतात. गुरुजींनी इंग्रजी साहित्याबरोबर प्राचीन मराठी संतकाव्याचा अभ्यास केला आहे. संस्कृत वाङ्मय वेदउपनिषदे यांचा अभ्यास केला आहे. त्यांच्यावर महात्मा गांधी, विनोबा भावे यांचा प्रभाव आहे. गुरुजींचे आणखी एक वैशिष्ट्य



MAHATMA PHULE MAHAVIDYALAYA PIMPRI PUNE-17

म्हणजे त्यांच्या साहित्यातून दिसणारी उपमा, उपमेय, प्रतिमा, प्रतीक, रूपके यांच्या असलेल्या मुक्त उधळणामुळे त्यांच्या साहित्याला एक आगळावेगळा गोडवा प्राप्त झाला आहे. महाभारताचे महान वस्त्र परमेश्वर अनंत काळापासून विणत आहे. कोठेतरी कोपऱ्यात फुललेल्या फुलाचा सुगंध वाऱ्याबरोबर दाही दिशांत जातच असतो, माझं जीवन म्हणजे वाऱ्यावरची वावडी आहे, ही वावडी परमेश्वर ओढवीत असला, तरी सारे भलतेच होईल अशी वाक्ये दिसतात. या प्रतिमा प्रतीकांमुळे त्यांचे लेखन सुबोध आणि अर्थपूर्ण झाले आहे. साने गुरुजींच्या भाषेत एक लालित्य आहे. शब्दसंपदा त्यांच्या जिभेवर खेळते. संगीताचे पूर्ण स्वर जसे कानावर अलगद पडत राहातात, मनाला रिझवत राहातात तसेच साने गुरुजींचे लेखन आहे. भावना-विचारांच्या जगतात ते आपल्याला नेतात. भावनांची खळबळ ते जागी करतात आणि विचारांची उंच आंदोलने ते आपल्याला घ्यायला लावतात. त्यांचे लेखन आपल्याला पवित्र मंगलमय बनवते. साने गुरुजींचे साहित्य जो वाचेल तो निश्चित सुसंस्कारित होईल. त्याच्या मनात दृष्ट विचारांची जळमटे नाहीशी करण्याची ताकद साने गुरुजींच्या लिखाणात आहे.

**संदर्भसूची –**


१) धडपडणारी मुले, साने गुरुजी, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, प्रकाशन वर्ष २०१२ पृष्ठ क्रमांक ८ .

२) श्यामची आई, साने गुरुजी, पुणे विद्यार्थी गृह, प्रकाशन पुणे ३०, एप्रिल २०१०.